तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्रं.२२/२०२५

डॉ.सौ.पुजा प्रसाद बेळगली
रा.विजयश्री, रघुनाथ पार्क, विजय पार्क जवळ,
हरिपूर, सांगली ४१६४१६ } तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. डॉ.जे.जे.मगदूम ट्रस्ट,
डॉ.जे.जे मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,जयसिंगपूर
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर
२. डॉ.जे.जे मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,जयसिंगपूर
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर } वि.प.

डॉ.जे.जे.मगदूम ट्रस्ट, जयसिंगपूर या शिक्षण संस्थेचे डॉ.जे.जे मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर येथील डॉ.सौ.पुजा प्रसाद बेळगली यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०४/११/२०२५ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

तक्रारीचे स्वरूप :

मी, सदर महाविद्यालयात ऑगस्ट २००९ पासून सेवेत आहे. माझी तब्बल १६ वर्ष या संस्थेत सेवा झालेली आहे. दि.२०/०३/२०२३ रोजी महाविद्यालय प्रशासनाने कारणे दाखवा नोटीसा दिली त्यास मी दि.२४/०४/२०२३ रोजी सविस्तर खुलासा दिला. त्यानंतर दि.२३/०६/२०२३ रोजी प्रशासनाने माझी वेतनवाढ का रोखण्यात येवू नये याबाबत खुलासा मागितला, त्याचा खुलासा मी दि.२७/०६/२०२३ रोजी मुद्येनिहाय दिला. मात्र माझा खुलासा अमान्य करून दि.०१/०७/२०२३ रोजीच्या पत्राने मला देय असणारी वेतनवाढ नाकारली असून त्या तारखेपासून आज अखेर एकही वेतनवाढ मला दिलेली नाही. तब्बल दोन वर्ष सहा महिने पेक्षा जास्त कालावधीनंतर त्यांनी परत मला जुन्या कारणे दाखवा नोटीस वरून नव्याने प्राथमिक चौकशी लावलेली आहे. ही बाब माझ्यावर अन्यायकारक आहे. वेतनवाढ नाकारल्या कारणास्तव, मी त्या विरूध्द विद्यापीठ तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज क्रमांक ३१/२०२३ दाखल केला. दि.२६/०३/२०२४ रोजी माझा अर्ज खारीज

केला आहे. त्याच बाबी संदर्भात, तक्रार निवारण समितीने चुकीचा निर्णय दिल्यामुळे मे. पुणे न्यायाधिकरण येथे केस दाखल केलेली असून त्याचा निर्णय प्रलंबित आहे.

असे असताना दि.०४/१०/२०२५ रोजी ई-मेलव्दारे प्राथमिक चौकशी समितीला सामोरे जाण्याचे पत्र पाठवले. ही प्राथमिक चौकशी दि.२०/०३/२०२३ च्या कारणे दाखवा नोटीसाशी अनुसरून असल्याचे कळविले. पण हयाच कारणे दाखवा नोटीसीवरून त्यांनी माझी वेतनवाढ रोखली आहे. या संदर्भात मी दि.१३/१०/२०२३ रोजी ही प्राथमिक चौकशी समिती रदद करण्याबाबतचे विनंती पत्र मा.कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ यांना पाठवले. या कृतीस त्यांनी गैरकृत्य असे संबोधले व शिस्तभंगाची कारवाई का करू नये? याचा खुलासा मागितला. तसेच त्यांनी ही प्राथमिक चौकशी समिती मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार मा. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी गठीत केलेली आहे असे कळविले आहे. जर माझी प्राथमिक चौकशी ही उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार होत असेल तर त्यांची एक प्रत माझ्याकडे असणे आवश्यक आहे. ती प्रत मला मिळणे बाबत मी विनंती केली असताना, त्या मागणीस त्यांनी खुलासा देण्यास टाळाटाळ करत आहात असे कळविले. मी फेर विंनती करूनही मला त्या आदेशाची प्रत मिळाली नाही. उलट दि.२९/१०/२०२५ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी परत एकदा प्राथमिक चौकशी समितीला दि.०७/११/२०२५ रोजी उपस्थित राहण्यास सांगितले. ही चौकशी दि.०६/०६/२०२३ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसबाबत असल्याचेही कळविले आहे. पण मला दि.०६/०६/२०२३ रोजी कोणतीही नोटीस मिळालेली नाही. या सर्व घटनांवरून असे निर्दशनास येते की, त्यांना फक्त मला मानसिक त्रास द्यायचा आहे. या सर्व बाबी लक्षात घेता, प्राथमिक चौकशी समिती त्वरीत रदद् करावी ही विनंती.

महाविद्यालयाचा अभिप्राय-

तक्रारदाराने दि.२०/०३/२०२३ आणि दि.२३/०६/२०२३ रोजीच्या महाविद्यालयाने दिलेल्या दोन कारणे दाखवा नोटीसीबाबत तक्रार अर्ज दिलेला आहे. दि.२३/०६/२०२३ रोजीच्या वेतनवाढ का रोखू नये याबाबत दिलेल्या कारणे दाखवा नोटीसीवर मा.विद्यापीठ तक्रार निवारण समितीसमोर तक्रार अर्ज क्र. ३१/२०२३ मध्ये दि.२६/०३/२०२४ रोजी महाविद्यालयाच्या बाजूने निर्णय पारित झाला. त्याविरूध्द तक्रारदाराने मे.पुणे न्यायाधिकरण यांचेकडे अपिल क्रमांक १०/२०२४ केले आहे. हे अपिल मे. विद्यापीठ न्यायाधिकरण, पुणे यांचेकडे प्रलंबित आहे.

तक्रारदाराने दि.२०/०३/२०२३ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसीबाबत दिलेल्या तक्रारीची सद्यस्थिती अशी आहे की, दिनांक २३/०६/२०२३ रोजीच्या कारणे दाखवा नोटीशीवर मा.विद्यापीठाने चौकशी सदस्य नाकारल्यामुळे महाविद्यालयास मा.उच्च न्यायालयामध्ये रिट पिटिशन क्रं. १७४७०/२०२४ दाखल करणे भाग पडले होते. मा.उच्च न्यायालयाने दि.१७/०७/२०२३ रोजी आदेश देताना we find it is the statutory obligation on the part of the university to appoint committee असे निर्देशत केल्यानंतर प्राथमिक चौकशी समिती गठीत करणेत आली. मा.उच्च न्यायालयामध्ये महाविद्यालयास दाद मागावी लागल्या कारणास्तव दि.२०/०३/२०२३ रोजी प्राथमिक चौकशी समिती गठीत झाल्यानंतर प्राथमिक चौकशीस सुरवात करण्यात आली. मा. विद्यापीठाकडे दिनांक ०६/०६/२०२३ रोजी चौकशी समिती गठीत करण्याबाबत दिलेल्या पत्राचा उल्लेख करण्यात आला होता. त्यादरम्यान दि.०१/१०/२०२५ रोजी जा.क्र.१५८ प्रमाणे मा.प्राचार्य यांनी प्राथमिक चौकशी समितीच्या बैठकीबाबतचे पत्र तक्रारदारास पाठविण्यात आले.

ही प्राथमिक चौकशी दिनांक २०/१२/२०२५ रोजी पूर्ण करण्यात आली. परंतु चौकशी समितीचे मुख्य, प्राचार्य हे विद्यापीठ मान्यताप्राप्त नसल्यामुळे दिनांक २७/०२/२०२६ रोजी पुनःश्च प्राथमिक चौकशी विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य व गठीत समिती सदस्यांच्या नियुक्तीने करण्यात आली. अशा प्रकारे प्राथमिक चौकशी दि.२७/०२/२०२६ रोजी संपून त्याचा अहवाल मा.बोर्ड ऑफ गव्हर्नन्स यांनी मंजूरी देवून मा.विद्यापीठाकडे अंतिम चौकशीकरिता चौकशी अधिकारी मंजूरीकरिता पाठविण्यात आला. अहवाल मा. विद्यापीठाने स्वीकारून अंतिम चौकशी अधिकारी नेमणूकीस मान्यता दिली आहे. अशी वस्तुस्थिती असताना मा.उच्च न्यायालयाने निर्देशित केल्याप्रमाणे मा.विद्यापीठाने गठीत केलेली प्राथमिक चौकशी रदद करण्यासाठी तक्रारदाराने तक्रार अर्ज देवून महाविद्यालय व प्राथमिक चौकशी समितीस कायदेशीर कामांमध्ये अडथळा केला होता. ही सर्व वस्तुस्थिती पाहता तक्रारदाराने दिनांक २०/०३/२०२३ रोजीच्या कारणे दाखवा नोटीशीवर दिनांक १३/१०/२०२५ रोजी प्राथमिक चौकशी समितीला दिलेल्या तक्रारीवरच ही तक्रार दिनांक ०४/११/२०२५ रोजी दाखल केली आहे. ज्यामध्ये प्राथमिक चौकशी समिती रदद करणेबाबत विनंती केली आहे की जी दिनांक २७/०२/२०२६ रोजी संपुष्टात आलेली आहे. मा. शिवाजी विद्यापीठाकडे आलेल्या तक्रारीबददलची जी प्रक्रिया असावी त्याबाबत स्वतंत्र अर्ज सोबत संस्थेमार्फत आणि महाविद्यालातर्फे देत आहोत.

समितीची निरीक्षणेः-

तक्रारदार यांची तक्रार अवलोकनी घेतली असता खालील बाबी या समितीसमोर मांडल्या आहेत.

१. महाविद्यालय प्रशासनाने तक्रारदार यांस दि. २०/०३/२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस दिली. त्यास तक्रारदार यांनी दि. २४/०४/२०२३ रोजी सविस्तर खुलासा दिला.

२. त्यानंतर दि.२३/०६/२०२३ रोजी प्रशासनाने तक्रारदार यांची वेतनवाढ का रोखण्यात येवू नये याबाबत खुलासा मागितला. त्याचा खुलासा तक्रारदार यांनी दि.२७/०६/२०२३ रोजी मुद्देनिहाय दिला.

३. दि. २७/०६/२०२३ रोजीचा खुलासा असमाधानकारक असून तो मान्य नाही, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या परिनियमामधील कलम २११ (३) (ii) अन्वये संस्था विरोधी कारवाया केल्यामुळे सन २०२२-२३ ची वेतनवाढ रोखण्यात येत असल्यामुळे संस्थेने दि. ०१/०७/२०२३ रोजीच्या पत्राने कळविले.

४. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार, तब्बल दोन वर्षे सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीनंतर जुन्या कारणे दाखवा नोटीसीवरून प्राथमिक चौकशी लावलेली आहे.

५. वेतनवाढ नाकारले कारणास्तव तक्रारदार यांनी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज क्र. ३१/२०२३ दाखल केला. तक्रार निवारण समितीने त्याची सुनावणी घेवून दि.२६/०३/२०२४ रोजी अर्ज खारीज केला.

६. तक्रार निवारण समितीच्या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांनी महाविद्यालय व विद्यापीठ न्यायाधिकरण यांचेकडे अपील दाखल केले ते प्रलंबित आहे.

७. उपरोक्त अपील विद्यापीठ न्यायाधिकरणासमोर प्रलंबित असताना महाविद्यालयाने दि. ०४/१०/२०२५ रोजी ईमेलद्वारे प्राथमिक चौकशी समितीला सामोरे जाण्याचे पत्र पाठविले. ही प्राथमिक चौकशी दि. २०/०३/२०२३ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसीस अनुसरून असल्याचे कळविले.

८. तक्रारदार यांच्यामते, दि. २०/०३/२०२३ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसीवरून त्यांची वेतनवाढ रोखण्यात आली आहे. सबब दि. १३/१०/२०२३ रोजी प्राथमिक चौकशी समिती

रद्द करण्याबाबत शिवाजी विद्यापीठास पत्र पाठविले. महाविद्यालयाकडून तक्रारदार यांना सदर प्राथमिक चौकशी समिती मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी गठीत केली असल्याचे कळविले आहे.

९. तक्रारदार यांच्या मते, जर प्राथमिक चौकशी समिती उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार होत असेल तर त्याची एक प्रत त्यांच्याकडे असणे आवश्यक आहे व महाविद्यालयास विनंती करूनही त्यांच्याकडून प्रत मिळालेली नाही व प्राथमिक चौकशी समितीचे कामकाज पुढे सुरू ठेवले. सबब तक्रारदार यांना मानसिक त्रास देण्याच्या हेतूने प्राथमिक चौकशी समिती लावली असून ती रद्द करण्याबाबत या तक्रारीच्या स्वरूपाने विनंती केली आहे.

समितीसमोर महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी लेखी म्हणणे खालीलप्रमाणे सादर केले आहे.

१. तक्रारदाराने दि. २०/०३/२०२३ आणि दि. २३/०६/२०२३ रोजीच्या महाविद्यालयाने दिलेल्या दोन कारणे दाखवा नोटीसींबाबत तक्रार अर्ज दिला आहे. संस्था महाविद्यालयाने दि. २३/०६/२०२३ रोजीची वेतनवाढ का रोखू नये याबाबत केलेली कार्यवाही व सद्यस्थिती महाविद्यालय आणि विद्यापीठ न्यायाधिकरणासमोर अपील प्रलंबित असल्याची बाब संस्था महाविद्यालयास मान्य आहे.

२. संस्थेने दिलेल्या स्वतंत्र लेखी म्हणण्यामध्ये संस्थेने विद्यापीठाचे परिनियम २१६ अंतर्गत प्राथमिक खातेनिहाय चौकशी केली आहे.

३. ही प्राथमिक चौकशी दि. २७/०२/२०२६ रोजी पूर्ण झालेली आहे.

४. प्राथमिक चौकशीचा अहवाल शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांना सादर केला असून परिनियम २१६ (सी) नुसार चौकशी अधिकारी नेमणुकीस मान्यता मिळाली आहे.

५. सबब तक्रारदार यांची प्राथमिक चौकशी संबंधितील तक्रार दि. ०४/११/२०२५ रोजी संपुष्टात आलेली आहे.

६. तक्रारदार यांची ही तक्रार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील कलम ७९ अंतर्गत गठीत तक्रार निवारण समितीसमोर चालणेस पात्र नाही. संस्थेच्या मते अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) दि. २५/०३/२०२१ रोजीच्या नोटीफिकेशनमधील मुद्दा ४

(i) अन्वये प्रत्येक तांत्रिक महाविद्यालयाकडे महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांची तक्रार निपटण्याकरीता प्रणाली असणे अत्यावश्यक असते. या प्रणालीनुसार महाविद्यालयात महाविद्यालयाची तक्रार निवारण समिती असणे अनिवार्य आहे. महाविद्यालयामध्ये देखील एआयसीटीई ने निर्देशीत केलेल्या नियमावलीचा अवलंब करून तयार केलेली तक्रार निवारण समिती उपलब्ध आहे.

७. मुद्दा क्र. ४ (ii) अन्वये महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्याने आपली तक्रार ही महाविद्यालयाच्या तक्रार निवारण समितीकडे, प्राधान्याने चेअरमन, तक्रार निवारण समिती यांना द्यावी लागते. महाविद्यालयाचे प्राचार्य या तक्रार निवारण समितीचे चेअरमन असतात. त्यामळे तक्रारदार यांनी विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडे दाखल केलेली तक्रार ही आधी महाविद्यालयाच्या तक्रार निवारण समितीकडे करणे अपेक्षित होते.

८. मुद्दा क्र. ४ (iii) अन्वये महाविद्यालयाच्या तक्रार निवारण समितीने याची दखल घेवून त्याबाबतचा अहवाल संबंधित तंत्र शिक्षण संचालनालय किंवा संलग्न विद्यापीठ यांना त्यांच्या शिफारशीसह तक्रार दाखल झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसात पाठवणे अपेक्षित असते. तसेच या अहवालाची एक प्रत संबंधित तक्रारदार कर्मचाऱ्यांना देखील द्यावी लागते.

९. मुद्दा क्र.४ (iv) अन्वये महाविद्यालयातील समितीसमोर तक्रारींचा समाधानकारक निपटारा नाही झाला तर त्यांना विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडे अपील दाखल करण्याची मुभा असते.

१०. पुढे संस्थेच्या मते, तक्रारदार यांनी या समितीकडे दाखल केलेली तक्रार आधी महाविद्यालयाच्या तक्रार निवारण समितीकडे येणे अपेक्षित होते परंतु थेट विद्यापीठ तक्रार निवारण समितीकडे तक्रार केली असल्याने त्यांनी एआयसीटीई च्या नियमावलीचे उल्लंघन केले आहे. तक्रारदार यांनी महाविद्यालयाच्या तक्रार निवारण समितीकडे एआयसीटीईच्या नियमानुसार तक्रार अर्ज देणे अपेक्षित होते त्यानंतर त्या समितीच्या महाविद्यालयाचे प्राचार्य यांचा तक्रारीचा रिपोर्ट विथ रेकमेंडेशन विद्यापीठास पाठविणे अपेक्षित होते. सबब या समितीने या तक्रारीची दखल न घेता ती फेटाळणे कायदेशीर व न्यायाचे होणार आहे या कारणास्तव तक्रारदाराचा अर्ज निकाली काढणेत यावा.

सोबत एआयसीटीई दि. २५/०३/२०२१ रोजीचे नोटीफिकेशन जोडले आहे व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांची तक्रार निवारण समितीची कार्यप्रणाली जोडली आहे.

संस्थेचे लेखी म्हणणे सादर केले असून त्यांच्या म्हणण्यामध्ये एआयसीटीई रेग्युलेशन मधील प्राचार्य हे तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष असून संस्थेचे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश नसतो तरीदेखील विद्यापीठाने संस्थेचे उपाअध्यक्ष, सेक्रेटरी यांचे नावे नोटीस दिली आहे. संस्थेचे उपाध्यक्ष व सेक्रेटरी यांच्या समितीसमोरील उपस्थितीबाबत मुद्दा मांडला आहे व संस्था उपाध्यक्ष व सेक्रेटरी यांची उपस्थिती तक्रार निवारण समितीसमोर आवश्यक नसल्याबाबत मांडले आहे व त्यांच्या उपस्थिती व अनुपस्थिती माफ होवून प्राचार्य यांना बैठकीकरीता उपस्थित राहण्याबाबत परवानगी द्यावी अशी विनंती केली आहे.

संस्था व महाविद्यालयाचे मूळ तक्रारीच्या अनुषंगाने लेखी म्हणणे अवलोकनी घेता दोन्ही म्हणण्यामधील सारांश असा की, तक्रारदाराने केलेली यासमितीसमोरील तक्रार कायदेशीरदृष्टया चालणेस पात्र नाही. याच्या पृष्ठयार्थ त्यांनी एआयसीटीई दि.२५/०३/२०२१ रोजीच्या नोटीफिकेशचा आधार घेतला आहे. या नोटीफिकेशनमधील कलम ४ नुसार त्या संस्थेच्या शिक्षकाने सेवाविषयक बाबींसह सर्व तक्रारी प्रथम महाविद्यालयाच्या अंतर्गत असणा-या तक्रार निवारण समितीकडे करण्याची तरतूद आहे. या तरतूदीमुळे या समितीस शिक्षकाची थेट तक्रार स्विकारणे या समितीच्या कार्यकक्षेत येत आहे किंवा कसे?

या समितीच्या निष्कर्षानुसार एआयसीटीई ची नियमावली मधील कलम ४ अभ्यास केला असता, विद्यापीठाच्या तक्रार निवारण समिती ही अंतिम व कायदेशीर निवाडा करण्याचे अधिकारक्षेत्र या विद्यापीठ समितीकडेच आहेत. प्रस्तुत प्रकरणात शिस्तभंगाची कार्यवाहीचा निर्णय स्वतः संस्था व्यवस्थापन व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी घेतला आहे. व्यवस्थापनाच्या या एकतर्फी निर्णयाविरूध्द तक्रारदाराची तक्रार आहे व याच व्यवस्थापनाच्या नियंत्रणाखाली असणारी तक्रार निवारण समिती (ज्याचे अध्यक्ष प्राचार्य आहेत असे संस्थेने त्यांच्याच म्हणण्यामध्ये मांडले आहे.) यांच्याकडे पुनःश्च ती तक्रार पाठविणे ही न्यायोचित होणार नाही. अंतर्गत समितीचा पर्याय हा तांत्रिक स्वरूपाचा मानला जावू

शकतो. एआयसीटीई च्या नियमावलीचा मुख्य उद्देश तक्रारदारांच्या तक्रारींचा वेळेत निपटारा होणेकरिता हा आहे.

समितीच्या मते, या तक्रार निवारण समितीस ही तक्रार स्विकारणेस कायद्याच्या दृष्टीने बाधा येत नाही. सदर महाविद्यालय हे विद्यापीठाशी संलग्न असलेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ व त्यास अनुसरून असणारे परिनियम विद्यापीठाच्या अंतर्गत असणा-या संलग्नीत महाविद्यालये, परिसंस्था यास बांधिल आहेत. एआयसीटीई ची मार्गदर्शक नियमावली असली तरी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ वैधानिक अधिकार अबाधित आहेत असे या समितीचे मत आहे.

एआयसीटीई च्या नियमानुसार असलेल्या महाविद्यालयाअंतर्गत समिती आणि विद्यापीठ कायद्यानुसार गठीत झालेली समिती या दोन्हीही समित्या एकमेकांस पूरक आहेत. त्या परस्परांना बाधक नाहीत. महाविद्यालयाअंतर्गत समिती अस्तित्वामुळे विद्यापीठ अंतर्गत समितीमुळे विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्राला कोणताही कायदेशीर अडथळा निर्माण होत नाही. सबब सदरची तक्रार या समितीसमोर कायदेशीररित्या चालविणेस पात्र आहेत असे या समितीचे सर्वानुमते मत आहे.

संस्थेने उपस्थित केलेल्या उपाध्यक्ष व सेक्रेटरी यांच्या उपस्थितीबात ही समिती स्पष्ट करते की, एखाद्या शिक्षकांच्या सेवेच्या अनुषंगाने शिस्तभंगाची कार्यवाही करतेवेळेस महाविद्यालयाच्या शिक्षकांना लागू असणाऱ्या विद्यापीठाच्या परिनियमानुसार कडक शिस्तेबाबत करावयाची कारवाई ही संस्था अखत्यारीत येते. ती बाब प्राचार्यांच्या अखत्यारीत नाही. संस्था ही शिक्षकाचे नियुक्ती प्राधिकरण आहे. संस्थेचे म्हणणे देखील या समितीसमोर येणे न्यायाच्या अनुषंगाने आवश्यक आहे. विद्यापीठ अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या नियमावलीमधील मुद्दा क्र. ५ मध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्यांना बैठकीस उपस्थित राहणे आवश्यक केले आहे. तथापि संस्थेतर्फे प्रतिनिधी यांना अध्यक्ष अथवा सचिव अधिकृत केले असून अधिकारपत्र सादर करणे आवश्यक केले आहे. याचाच अर्थ असा की, संस्थेतर्फे अध्यक्ष अथवा सचिव निर्णय घेणारे प्राधिकरण असल्याने त्यांनी उपस्थित राहणे आवश्यकच आहे. परंतु काही कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेस त्यांचे वतीने निर्णय घेवू शकणाऱ्या सक्षम व्यक्तीस प्राधिकृत करू शकते. या तक्रार निवारण समितीसमोर येणारया तक्रारी शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत असणा-या महाविद्यालय परिसंस्थेमधील शिक्षक शिक्षकेत्तर यांच्या असतात. या तक्रारी सेवाबाबीविषयक असलेने

त्या संस्था, परिसंस्था, महाविद्यालय व्यवस्थापन यांचेविरूध्द असतात. या तक्रारींच्या निर्णयापूर्वी संबंधित पक्षकार म्हणजेच तक्रारदार, त्याचे संस्था व्यवस्थापन व महाविद्यालय या सर्वांचे म्हणणे ऐकूण घेणे नैसर्गिक न्याय तत्वानुसार आवश्यक आहे.

मूळ तक्रारीच्यासंदर्भात समितीची निरीक्षणे खालीलप्रमाणे,

तक्रारदार यांच्या तक्रारीमध्ये दोन कारणे दाखवा नोटीसींचा उल्लेख आहे. दि.२०/०३/२०२३ रोजीची कारणे दाखवा नोटीस ही शिक्षक म्हणून कर्तव्य व जबाबदारीमध्ये वारंवार कसूर करणे, महाविद्यालयाच्या सेवानियम, शर्ती व संहितेचे उल्लंघन केल्याबाबत व इतर गैरवर्तनांबाबत कारणे दाखवा नोटीस दिल्याचे दिसून येते. तसेच दि. २३/०६/२०२३ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसीचा आशय तक्रारदार यांनी कोणत्याही प्रकारची Fundings Proposals सादर केलेली नाहीत. डीन पदावर असताना देखील कोणत्याही प्रकारचे विद्यार्थी अभिमुख भरीव योगदान दिलेले नाही. संस्थेने सोयीसुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. अगर मागणी प्रमाणे देत असताना देखील आपण संस्थेसाठी कोणत्याही प्रकारचे आर्थिक व विद्यार्थी पोषक अशा सुधारणा करू शकलेला नाही. तसेच गेल्या पाच वर्षात कोणतेही भरीव शैक्षणिक कार्य न करता केवळ तक्रारी करीत असल्याबाबत सन २०२२-२३ या वर्षाची महाविद्यालयाबाबतची अनास्था, अविश्वासार्हता व विध्वंसक प्रवृत्ती या सर्व बाबींबाबत वार्षिक वेतनवाढ का रोखण्यात येवू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस दिल्याचे दिसून येते.

या समितीने दोन्ही कारणे दाखवा नोटीसींबाबत संस्था महाविद्यालयाने केलेली कार्यवाही अवलोकनी घेतली. जा.क्र. जेजेएमटी/२०२२-२३/१६४, दि. २०/०३/२०२३ रोजीची कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी दि.२४/०४/२०२३ रोजी खुलासा दिल्याचे नमूद केले आहे. जा.क्र. जेजेएमटी/२०२२-२३/१९९ सेक्रेटरी डॉ. जे.जे. मगदूम ट्रस्ट यांनी तक्रारदार यांना दि. ०६/०५/२०२३ रोजी दिलेले पत्र. या पत्रामध्ये तक्रारदार यांचा खुलासा समाधानकारक नसलेने पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करणेबाबत कळविले दिसून येते. संस्थेच्या दि.११/०५/२०२३ रोजीच्या विशेष सभेत ठराव - तक्रारदार डॉ. बेलगली यांच्या गैरवर्तनासंदर्भात प्राथमिक चौकशी करावी आणि प्राथमिक चौकशीवर विद्यापीठाकडून नावे मिळण्याबाबत ठराव दिसून येतो. दि.०६/०६/२०२३,

दि. ०७/१०/२०२३, दि. ११/०३/२०२४ रोजी वारंवार मागणी करून देखील विद्यापीठाने समिती न दिल्याने संस्थेने परिनियम २१६ ए नुसार नामनिर्देशन मिळणेबाबत याचिका दाखल केली.

याचिका क्र.१७४७०/२०२४ मधील दि.१७/०७/२०२५ रोजी विद्यापीठास समिती सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाचे आदेश प्राप्त झाले.प्रथम समिती दि.०८/०८/२०२५ जा.क्र. एसयु/संलग्नता/व्हीटीडी/टे.५/इंजि./१३०४ समिती देण्यात आली. नाव चुकल्याने पुनःश्च दि.११/०८/२०२५ रोजी कळविण्यात आले. प्राचार्य यांचे दि.१९/०८/२०२५ रोजीची JJMCOE/२०२५-२६/६४ ने तिन्ही मेंबर जेन्टस असल्याबाबत कळविले व महिला सदस्य देण्याबाबत विनंती केली. दि. २९/०८/२०२५ जा.क्र. एसयु/संलग्नता/व्हीटीडी/टे.५/इंजि./१५०१ च्या पत्राने दि. ११/०८/२०२५ ची समिती कायम करण्यात आली व उपरोक्त महिला सदस्याची मागणी अमान्य करण्यात आली.

जा.क्र. जेजेएमसीई/२०२५-२६/८० दि. ३०/०८/२०२५ रोजी समितीमधील डॉ. एम. एस. पाटील यांचे नाव बदलून मिळणेबाबत. त्यास अनुसरून दि.१६/०९/२०२५ रोजी विद्यापीठाकडून पत्र पाठविण्यात आले. पुनःश्च दि.२२/०९/२०२५ रोजी संस्थेने डॉ. आगाशे यांचेऐवजी दुसऱ्या शिक्षकांचे नाव मिळण्याबाबत विनंती केली. दि.३०/०९/२०२५ रोजी डॉ. रश्मी देशमुख यांचे नाव बदलून विद्यापीठाने कळविले. त्यानंतर दि.११/११/२०२५ रोजीच्या पत्राने संस्थेने विद्यापीठास डॉ. एस.ए. पाटील यांचेऐवजी दुसरे शिक्षक प्रतिनिधी कळविले. त्यास अनुसरून दि.२९/११/२०२५ रोजीच्या पत्राने विद्यापीठाने डॉ. वाय. एम. पाटील प्रतिनिधी बदलून दिले.

यानंतर दि.२०/१२/२०२५ रोजीचा चौकशी समितीचा अहवाल महाविद्यालयाने विद्यापीठास पाठविला. विद्यापीठाने दि.२७/०१/२०२६ रोजी चौकशी समितीमधील अध्यक्ष तथा प्राचार्य म्हणून डॉ. हरिशानंद के. एस यांची संस्थेने केलेली नियुक्ती व त्यास विद्यापीठ कार्यालयाकडून मान्यता नसल्याने तक्रारदार बेलगली यांच्या चौकशी समितीचा अहवाल ग्राहय धरता येत नसल्याचे कळविले. त्यानंतर दि. १८/०२/२०२६ रोजी विद्यापीठाने संस्थेस नव्याने चौकशी करून प्राथमिक चौकशी अहवाल त्वरीत या कार्यालयास सादर करणेबाबत कळविले. त्यास अनुसरून संस्थेने चौकशी अहवाल

पाठविला आहे व त्यास अनुषंगाने पुढील कार्यवाही संस्था महाविद्यालय करीत असल्याचे निर्देशनास आले.

दि.२३/०६/२०२३ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने जा.क्र. जेजेएमसीई/ आस्था वि./नोटीस/२२-२३ तक्रारदार यांना नोटीस दिल्याचे दिसून येते. तक्रारदार यांनी प्र.प्राचार्य यांना दि. २७/०६/२०२३ रोजी वार्षिक वेतनवाढीबाबत खुलासा सादर केल्याचा दिसून येतो. संस्थेचे जा.क्र.जेजेएमसीई/वेतनवाढ रोखणे/३७७/६/२०२२-२३, दि. ०१/०७/२०२३ वेतनवाढ रोखले बाबत तक्रारदार यांना दिलेले पत्र दिसून येते. तक्रारदार यांनी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज क्र. ३१/२०२३ दाखल केला. दि. २३/०६/२०२३ रोजी संस्थेने सन २०२२-२३ ची वेतनवाढ का रोखण्यात येवू नये याचा खुलासा मागितला. तक्रार निवारण समितीने सन २०२२-२३ मध्ये घडलेल्या कृतीवर नाराज होवून संस्थेने दि. २३/०६/२०२३ रोजी कारवाई केली आहे व दि.०१/०७/२०२३ रोजी सन २०२२-२३ रोजीची वेतनवाढ रोखली आहे. असे निष्कर्ष देवून, समितीने या किरकोळ स्वरूपाच्या शिक्षेमध्ये हस्तक्षेप न करता तक्रार अर्ज खारीज केल्याचे दिसून येते. याचा अर्थ दि.२३/०६/२०२३ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने दि.०१/०७/२०२३ रोजीच्या पत्राने वेतनवाढ रोखल्याचे दिसून येते. संस्थेच्या दि.०१/०७/२०२३ रोजीच्या पत्रामध्ये तक्रारदार यांनी दि.२७/०६/२०२३ रोजी ई-मेलद्वारे दिलेला खुलासा असमाधानकारक असून तो अमान्य केल्याचे स्पष्ट नमूद आहे. यावरून तक्रारदार यांच्या दि.२७/०६/२०२३ रोजीचा खुलासा हा दि.२३/०६/२०२३ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसीस अनुसरून होता हे अधिकचे स्पष्ट होते.

उपरोक्त दोन्हीही कारणे दाखवा नोटीसी व नोटीसीमधील मजकूर व त्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाही अवलोकनी घेतली असता, दि.२०/०३/२०२३ आणि दि.२३/०६/२०२३ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसी भिन्न आहेत. त्यांच्यामधील मजकूर वेगळा असून त्याअनुषंगाने झालेली कार्यवाही ही स्वतंत्र दिसून येत असल्याने समिती या निष्कर्षाप्रत येते की, तक्रारदाराची तक्रार नामंजूर करण्यास पात्र आहे. करिता समिती खालील आदेश पारित करीत आहे.

आदेश

तक्रार अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 27 MAY 2026

शिवाजी विद्यापीठ
तक्रार निवारण समिती
कोल्हापूर

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हॅगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.ए.बी.साळी)

अध्यक्ष
(श्री.एस.एन.पाटील)